बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय : लोकमंगल ,1501 .शिवाजीनगर ,पुणे05
टेलि -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे तामिळनाडू राज्यामध्ये धोरणात्मक बैठका , राज्याच्या औद्योगिक विकासाचा एकीकृत आधारस्तंभ म्हणून प्रवर्तन

**चेन्नई दिनांक ७ एप्रिल २०२३ :** तामिळनाडू राज्यातील आपल्या शाखांच्या व्यापक जाळ्याच्या मार्फत तामिळनाडू राज्यातील सर्व कळीच्या विभागांना व हितसंबंधीयांना विविध प्रकारच्या बँकिंग व संबंधित सेवा देण्यासाठी देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने दृढ़ निश्चय असून त्या संदर्भात महत्वपूर्ण बैठका व चर्चासत्रे चेन्नई येथे पार पडल्या. तामिळनाडू राज्यातील विविध कळीचे शासकीय व निमशासकीय विभाग, भारतीय उद्योग महासंघ, हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्स व विविध सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संघटना, आरोग्य, अन्नप्रक्रिया उद्योग, रासायनिक उद्योगातील अनेक व्यक्ती व संस्थांशी झालेल्या चर्चासत्रांचे नेतृत्व बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी केले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या चेन्नई विभागीय कार्यालयाचे विभागीय व्यवस्थापक व उपसरव्यवस्थापक श्री नागेंदर गौड हे देखील आपल्या बँकेच्या चमूसह या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

" वित्तीय वर्ष २३ मध्ये कर्ज व्यवहारात ३० % वाढ नोंदवून बँक ऑफ महाराष्ट्रने रु ४ ट्रिलियन एवढ्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला असून बँकेच्या आजवरच्या वाटचालीतील हा एक लक्षणीय व उल्लेखनीय मैलाचा दगड असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी सांगितले. हा ऐतिहासिक मैलाचा दगड पार केल्यामुळे बँकेच्या विस्ताराच्या पाउलखुणा आता देशभरात उमटल्या असून डिजिटल उपाययोजनांच्या माध्यमातून घडवून आणलेल्या परिवर्तनामुळे हे शक्य झाले असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. वित्तीय वर्ष २०२३ मध्ये बँकेच्या एकूण व्यवसायात २१% वाढ झाली असून बँकेच्या शाखांची संख्या २२०० पेक्षा अधिक झाली आहे.

" शाश्वत सर्वांगीण वाढीसाठी देशातील सर्व ७५७ जिल्ह्यांमध्ये बँकेची किमान एक शाखा असणे अभिप्रेत असून आमच्या देशभरातील सर्व ग्राहकांना किमान खर्चात सर्व सेवांना सुलभ व सुगम अभिगम असण्यासाठी बँक सक्रीयपणे प्रयत्नशील असल्याचा अभिप्राय व्यक्त करून श्री ए बी विजयकुमार यांनी बँकेच्या पुढील वाटचालीचा मार्ग स्पष्ट केला.

शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजना व मुख्य योजना सामाजिक तळागाळातील नागरिकांच्या पर्यंत पोहोचवून त्यांना स्वावलंबी करण्यासाठी बँक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या मजबुतीकरणासाठी बँकेने अनेक योजना व उपक्रम सुरु केले असून बँकेच्या सहयोगी व डिजिटल पद्धतीने TREDS मंचावर वित्त पुरवठा करण्यामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना निर्विघ्न बँकिंगचा अनुभव मिळेल असेही श्री विजय कुमार यांनी सांगितले.

" भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात तामिळनाडू राज्याचा महत्वाचा हिस्सा असल्यामुळे आमच्या व्यवसाय विस्तार योजनेत हे राज्य नेहमीच अग्रभागी व प्राधान्यावर राहील आणि राज्यातील नागरिकांना सर्वोत्तम सेवा देऊन आम्ही इथल्या व्यवसायाच्या उपलब्ध असलेल्या विविध संधींचा लाभ घेऊ. बँक ऑफ महाराष्ट्रच्या

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय : लोकमंगल ,1501 .शिवाजीनगर ,पुणे05
टेलि -020:25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

तामिळनाडू राज्यात ६७ शाखा असून व रु.10600 कोटी व्यवसायासह, जून २०२३ पर्यंत आणखी ७ शाखा सुरु करून शाखांचे जाळे अधिक मजबूत करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. आम्हाला सातत्याने सक्रीय मार्गदर्शन करणाऱ्या व पायाभूत सुविधांचा विकास, गृहनिर्माण व शहरी विकास, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांसाठी TREDS मंचाचा उपयोग, राज्य सरकारच्या सहयोगाने लघु उद्योगांशी सहकार्य, राज्यात स्टार्टअप उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी आम्हाला सहकार्य करणाऱ्या राज्यातील धोरणकर्त्यांचे आम्ही आभारी आहोत असे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी तामिळनाडू राज्यातील व्यावासायांच्या संधींबद्दल बोलताना सांगितले.

आपल्या शाखांच्या जाळ्याचा अधिक विस्तार करून व भविष्यात तामिळनाडू राज्यात स्टार्टअप उद्योगांसाठी एक वेगळी शाखा सुरु करण्याचा बँकेचा मानस असून राज्याच्या आर्थिक प्रगतीचा एक मजबूत आधारस्तंभ बनण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे. पुण्यामध्ये पहिली वाहिली स्टार्टअप उद्योगासाठी समर्पित वेगळ्या शाखेची स्थापना हा बँकेच्या वाटचालीतील एक अविस्मरणीय क्षण असून चेन्नई, मुंबई व दिल्ली येथे देखील अशा प्रकारच्या शाखा स्थापन करून स्टार्टअप उद्योगांसाठी पोषक व अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा बँकेचा प्रयत्न असेल असेही बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी सांगितले.

**छायाचित्रात भारतीय उद्योग महासंघाच्या चेन्नई विभागाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विषयक समितीचे निमंत्रक आर व्ही चारी हे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांना वार्षिक अहवाल सादर करत आहेत.**

